**प्रकल्प समन्वयक कार्यालय, राष्ट्रीय गोकुळ मिशन पी. एस. पंढरपूरी,**
**द्वारा विनायक तुळशीराम कांबळे, दुध पंढरी डेअरीमागे,**
**शाकुंतल नगर, इसबावी, पंढरपुर, जि. सोलापुर-४१३३०४ (महाराष्ट्र)**
**संपर्क क्र. ९४२२२३०६९६, ७९७२९४७६००** **ई-मेल- pcrgmpandharpur@gmail.com**

# राष्ट्रीय गोकुळ मिशन पी. एस. पंढरपूरी प्रकल्प

पंढरपुरी हि महाराष्ट्राच्या दक्षिण-पुर्व भागातील म्हशीची जात आहे. सोलापुर जिल्हयातील चंद्रभागा नदीच्या काठावर प्रसिध्द तीर्थक्षेत्र असलेल्या पंढरपुर या शहराचे नावावरून हे नाव पडले आहे. पंढरपुरी ही जात १५० वर्षापासुन येथील गवळी समाजामार्फत दुधासाठी पाळली जात असल्याचे स्नानिक लोक सांगतात. हि म्हशींची जात प्रामुख्याने कोरडे हवामान असणा-या सोलापुर, सांगली व कोल्हापुर या जिल्यामध्ये आढळते. कोरड्या हवामानासाठी अनुकूल व जास्त दुध देणारी म्हशीची जात आहे. साधारण १६ ते ४७ अंश सेल्सिअस तापमान असणा-या व साधारण पर्जन्यमान असणा-या भागामध्ये ती राहू शकते. या भागामध्ये हवामानानुसार घेण्यात येणा-या ज्वारी, बाजरी, मका व उसाचे वाडे या प्रकारच्या चा-यावरही ती चांगले दुध देते. तीचे वैशिष्ट्य म्हणजे ती काळया भोर रंगाची, काळया-पांढ-या शेपूट गोंड्याची, काही प्रमाणात अंगावर किंवा कपाळावर पांढरा ठिपका व लांब तलवारी सारख्या शिंगाची असते. शिंगाची लांबी ५ फुटापर्यंत लांब आढळून येते. शिंगानुसार टोकी, मेटी व भारकंडी असे प्रकार पडतात. महाराष्ट्रामध्ये पंढरपुरी म्हशींच्या शर्यतीसाठी वापरली जाते.

कोल्हापुर या शहरामध्ये धारोष्ण दुधासाठी पंढरपुरी म्हशी पाळल्या जात व ग्राहकाला घरोघरी जाऊन दुध देण्याची पध्दत होती. त्यामुळे कोणत्याही वेळी दुध देण्याच्या क्षमतेमुळे एटीएम (Any Time Milk) म्हैस म्हणुन प्रसिध्द आहे. या वैशिष्ट्यामुळे पंढरपुरीमध्ये केंद्र शासनाचे NBAGR द्वारे मान्यता प्राप्त १६ म्हशींमध्ये स्थान मिळाले आहे.

पंढरपुरी ही महाराष्ट्रातील प्रमुख जात असल्याने त्याचे संवर्धनासाठी व अनुवंशिक सुधारणेसाठी केंद्र शासनाचे अर्थसहाय्याने २०१४ पासुन महाराष्ट्र पशुधन विकास मंडळ, नागपूर व राष्ट्रीय डेअरी विकास बोर्ड, आणंद यांचे सहयोगाने सोलापुर जिल्हयातील पंढरपुर, माढा, सांगोला, माळशिरस, मंगळवेढा, मोहोळ, बार्शी, द. सोलापुर व उ. सोलापुर या ९ तालुक्यामध्ये "वंशावळ निवडीतून उच्च अनुवांशिक गुणवत्ता असलेले पंढरपूरी जातीचे वळू तयार करणे" हा प्रकल्प सुरू करण्यात आला आहे. प्रकल्पामार्फत सध्या ९ तालुक्यामध्ये ४० कृत्रिम रेतन सेवादाता केंद्रे सुरू आहेत. महाराष्ट्रामध्ये जनावरांच्या कानामध्ये टॅग मारण्याची सुरवात प्रथम या प्रकल्पामार्फत झाली आहे. २०१४ ते २०१९ या ५ वर्षाच्या कालावधीसाठी केंद्र शासनाच्या राष्ट्रीय दुग्ध योजना फेज-१ अंतर्गत अर्थसहाय्य मिळाले व २०१९ ते २०२६ या कालावधीसाठी राष्ट्रीय गोकुळ मिशन या अंतर्गत अर्थसहाय्याने चालु आहे. या प्रकल्पामध्ये काम करणारे सेवादाता हे शेतक-यांच्या दारात जाऊन पंढरपुरी म्हशींमध्ये कृत्रिम रेतनाची सेवा देतात.

या प्रकल्पामार्फत एप्रिल २०१९ पासुन डिसेंबर-२०२४ अखेर प्रकल्पाअंतर्गत पंढरपुरी म्हशीमध्ये एकूण ६४२५० कृत्रिम रेतने करण्यात आली आहेत. या योजना कालावधीमध्ये २९७६३ शेतक-यांना या योजनेचा लाभ मिळाला आहे. प्रकल्पामार्फत करण्यात आलेल्या एकूण कृत्रिम रेतनामध्ये गर्भधारणेचे प्रमाण ४४ टक्के आहे, हि बाब देशातील इतर म्हशींपेक्षा विशिष्ट आहे. २०१४ पासुन प्रकल्पामध्ये केलेल्या कृत्रिम रेतनापासुन ७९१६ मादी वासरे जन्मलेली आहेत. या प्रकल्पाअंतर्गत २०१४ पासुन ७७८३ पंढरपुरी म्हशींची दुध मोजणी करण्यात आली आहे. प्रकल्पामार्फत आजअखेर ७० वळू खरेदी करण्यात आले आहेत. राष्ट्रीय डेअरी विकास बोर्ड, आणंद यांचे २०१४ ते ऑक्टोबर २०२३ पर्यंचे अहवालानुसार प्रकल्पामार्फत केल्या जाणा-या १०० कृत्रिम रेतनामागे १३ मादी वासरे जन्माला येत असल्याचे म्हटले आहे. हि देशातील इतर म्हशींपेक्षा विषेश बाब म्हणून आढळून आली आहे.

पंढरपुरीचे दुधाचे सरासरी फॅटचे प्रमाण ८ टक्के आहे. प्रकल्पामध्ये दुध मोजणी करत असताना मंगळवेढा तालुक्यातील लक्ष्मीदहीवडी या गावामध्ये १५.४ फॅट असणारी पंढरपुरी म्हैस आढळून आली, तसेच एका वेतामध्ये ३२०० कि.लो. दुध उत्पादक क्षमता असणारी पंढरपुरी म्हैस आंधळगाव येथे आढळुन आली आहे. पंढरपुरीच्या १ लीटर दुधामध्ये ६ ग्रॅम पर्यंत प्रथिने आढळुन आली आहेत. तसेच दुधामध्ये केंद्र शासनाने पंढरपुरी म्हशीची किमान दुध उत्पादन १३०० ते १६०० कि.लो. असल्याचे म्हटले आहे. परंतु प्रकल्पामार्फत करण्यात आलेल्या ६००० म्हशींचे दुध मोजणीनुसार पंढरपुरी म्हशींची सरासरी दुध उत्पादन क्षमता २००० कि.लो. पेक्षा जास्त असल्याचे आढळून आले आहे. प्रकल्पामुळे पशुपालकांचे गोठयातच चांगल्या प्रकारच्या रेड्या उत्पादीत झाल्याने बाहेरून म्हशी खरेदी करण्याचे प्रमाण कमी झाले.

या प्रकल्पाचे उदिष्ठ उच्च अनुवांशिक गुणवत्ता असलेले पंढरपूरी जातीचे वळू तयार करणे आहे. शेतक-यामार्फत शास्त्रीय पध्दतीने तयार केलेले प्रकल्पामार्फत खरेदी करण्यात आलेले ३८ वळू या प्रकल्पामार्फत

Scanned with OKEN Scanner

विभागीय गोठीत रेत प्रयोगशाळा पुणे, औरंगाबाद , राष्ट्रीय डेअरी विकास बोर्ड, आणंद यांची गोठीत रेत प्रयोगशाळा, राहुरी सिमेन स्टेशन, बायफ पुणे, साबरमती आश्रम गौशाळा, गुजरात व अलमंडी सिमेन स्टेशन चेन्नई येथे वीर्य उत्पादनामध्ये वापरले जात आहेत. त्या पासून मिळणा-या सिमेन स्ट्रॉ महाराष्ट्र, गुजरात व कर्नाटक या भागात पुरवठा केल्या जात आहेत. तसेच, प्रकल्पामार्फत सोलापुर, पुणे, जालना व कोल्हापुर या जिल्हयातील प्रगतीशील पशुपालक यांना २१ रेडे हे नैसर्गिक रेतनासाठी वाटप करण्यात आले आहेत. यामुळे चांगली अनुवंशिक गुणवत्ता असणा-या म्हशीं त्या भागामध्ये तयार होणार आहेत व पर्यायाचे पशुपालकाचे दुध उत्पादन वाढेल.

पंढरपुरी या जातीच्या म्हशींची संख्या वाढविल्यास दुधाची वाढती गरज व शेतीपुरक दुग्धव्यवसायासाठी याचा उपयोग नक्कीच होणार आहे. निकृष्ट व कमी चा-यावर जास्त व चांगल दुध देणारी जगातील एकमेव म्हैस आहे. संकरीत गायी व म्हशींपेक्षा पंढरपुरी म्हशींवर औषधोपचारासाठी अतिशय कमी खर्च होतो. प्रकल्पामार्फत कृत्रिम रेतनाचे काम सुरू झाल्यापासून म्हशींमध्ये भाकड काळ कमी झाला म्हणजे ४५ ते ७५ दिवसाचा झाला आहे. या म्हशीचे गर्भधारणेची क्षमता उत्कृष्ठ असल्याने दुध व्यवसायसाठी अतिशय उपयुक्त आहे. पंढरपुरी हि जात १ वर्षामध्ये १ वासरू देण्यासाठी प्रसिध्द आहे. पंढरपुरीचा चांगला सांभाळ केल्यास दिवसाला १५-१६ लीटर दुध देण्याची क्षमता या म्हशींमध्ये आहे. प्रकल्पाचे आधी या म्हशींच्या विक्रीसाठी रू.२५,००० ते रू. ५०,००० होती, परंतु सध्या तीची किंमत हि साधारण रू. ६०,००० ते रू. १,४०,००० पर्यंत गेली आहे.

या प्रकल्पाची माहिती व समाज प्रबोधनासाठी एक लघुपट देखील बनवण्यात आला आहे व युट्युबवर https://youtu.be/EBS0btdhkRU (Pandharpuri Pedigree Selection Project) उपलब्ध आहे.

मुख्य कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र पशुधन विकास मंडळ, नागपूर यांचे मार्गदर्शनाखाली प्रकल्प प्रगती पथावर आहे.

**प्रकल्पामुळे झालेले फायदे –**

१. पंढरपुरी म्हशींमध्ये अनुवंशिक सुधारणा झाली
२. प्रशुपालक प्रमुख्याने म्हशीमध्ये कृत्रिम रेतनाकडे वळला.
३. टॅगींग व केंद्र शासनाच्या Bharat Pashudhan App या संगणक प्रणालीचे महत्व कळाले.
४. उच्च वंशावळ असलेल्या पंढरपुरी जातीच्या म्हशींची संख्या वाढली.
५. वासरांच्या रॅली मुळे कृत्रिम रेतना पासुन जन्मलेली चांगली वासरे शेतक-यांना पाहण्यास मिळाली.
६. दुध मोजणी मुळे पंढरपुरी म्हशींची दुधाची खरी उत्पादन क्षमता समजली.
७. शेतक-यांना म्हशीमधील विविध रोग व त्यांच्या चाचण्या तसेच Parentage disease testing व इतर बाबी बाबत माहिती मिळाली. ब-याच शेतक-यांच्या गोठयात पंढरपुरी म्हशींच्या २ पिढया उभ्या राहील्या.

**प्रकल्प समन्वयक**
**पंढरपुरी म्हैस वंशावळ सुधारणा प्रकल्प**
**महाराष्ट्र पशुधन विकास मंडळ**



Scanned with OKEN Scanner